वाचले :-

१) मा. अशंकालीन प्रचार्य, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुणे-१९ यांचे कडील पत्र क्र. औप्रसंपिचिं/शिप्रया/१९२५, दि ०८/०८/२०१६.

२) मा. अशंकालीन प्रचार्य यांचे कडील पत्र क्र. औप्रसंपिचिं/शिप्रया/१७७, दि २३/०१/२०१८.

३) जाहिरात क्र. प्रशा/११/कावि/८१/२०१८,दि ०१/०२/२०१८.

४) मा. सहा. आयुक्त, प्रशासन यांचे कडील दिनांक ०७/०३/२०१८ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.
क्र.प्रशा/११/कावि/ १५५/२०१८
दि.०७ / ०३/२०१८

विषय :- शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत महापालिका आस्थापनेवार शिकाऊ उमेदवारांचीनेमणूक करणेबाबत.

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवार शिकाऊ उमेदवार अधिनियम-१९६१ अंतर्गत सन-२०१७ चे सत्राकरीता उर्वरीत रिक्त जागेवर उपरोक्त वाचले क्र. २ व जाहिरात वाचले क्र. ३ अन्वये पात्र उमेदवारांना व्यवसाय निहाय प्रशिक्षण कालावधीकरीता खालील प्रमाणे नेमणूक देण्यात येत आहे.

**आरेखक स्थापत्य**

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | नेमणूक प्रवर्ग | प्रशिक्षण कालावधी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | शिंदे महेश बबन | भ.ज. (क) | १ वर्ष | ७३.५३ |
| २ | प्रियंका विनायक जुजगर | खुला | १ वर्ष | ७३.०८ |
| ३ | भुजबळ अजिंक्य सुभाष | इमाव | १ वर्ष | ६८.४४ |

**प्लंबर**

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | नेमणूक प्रवर्ग | प्रशिक्षण कालावधी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | साळवे तेजस राजू | अनु. जाती | १ वर्ष | ६९.२१ |
| २ | पाटील ज्ञानेश्वर प्रकाश | इमाव | १ वर्ष | ६८.१४ |
| ३ | शिनकर शशिकांत दिलिप | इमाव | १ वर्ष | ६८.०७ |
| ४ | राठोड किरण सुदाम | विजा-(अ) | १ वर्ष | ६७.२१ |

**इलेक्टिशियन**

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | नेमणूक प्रवर्ग | प्रशिक्षण कालावधी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | तायडे विशाखा साहेबराव | अनु. जाती | १ वर्ष | ७६.०४ |
| २ | देवतुले विठ्ठल नारायण | अनु. जमाती | १ वर्ष | ६८.७१ |

**वायरमन**

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | नेमणूक प्रवर्ग | प्रशिक्षण कालावधी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | शेटे संकेत दिलीप | इमाव | १ वर्ष | ६८.८५ |

**पंप ऑपरेटर**

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | नेमणूक प्रवर्ग | प्रशिक्षण कालावधी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | पाटील गणेश सोमनाथ | (इमाव)-खुला | १ वर्ष | ७८.७९ |
| २ | काटकर अक्षय बाजीराव | अनु. जमाती | १ वर्ष | ७३.९२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | जगताप अमोल रामचंद्र | इमाव | १ वर्ष | ६६.४३ |
| ४ | देवरे योगेश साहेबराव | अनु. जाती | १ वर्ष | ६५.२९ |
| ५ | खैरनार रूपेश महेंद्र | इमाव | १ वर्ष | ६४.२१ |

**पॅथॉलॉजी**

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | नेमणूक प्रवर्ग | प्रशिक्षण कालावधी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | चौधरी दिपक अविनाश | (इमाव)-खुला | ६ महिने | ७०.६२ |
| २ | वाघ रमेश शंकर | (इमाव)-खुला | ६ महिने | ६७.८५ |
| ३ | शेळके लिना प्रविण | खुला | ६ महिने | ६२. |
| ४ | मासाळ अशोक सखाराम | भ.ज.(क)-खुला | ६ महिने | ५९.०८ |
| ५ | मेंढे अक्षय विजय | अनु. जाती | ६ महिने | ५८.४६ |
| ६ | नांद्रे प्रतिक्षा सुनिल | इमाव | ६ महिने | ५७.३८ |
| ७ | दाभाडे विनायक विलास | अनु. जमाती | ६ महिने | ५६.३१ |
| ८ | धायगुडे समर्थ प्रकाश | भ.ज.(क) | ६ महिने | ४९.६९ |

**गार्डनर (माळी)**

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | नेमणूक प्रवर्ग | प्रशिक्षण कालावधी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | शेळके अनंत रामराव | भज-(क) - खुला | १ वर्ष | ६१.८८ |
| २ | आसवले प्रसाद बाळू | अनु. जमाती -खुला | १ वर्ष | ५८ |
| ३ | मेंढारे नितिन अरविंद | (इमाव)- खुला | १ वर्ष | ५५.२ |
| ४ | जाधव संतोष पोपट | विजा-(अ)- खुला | १ वर्ष | ४३ |
| ५ | जाधव अमोल गोविंद | विजा-(अ)- खुला | १ वर्ष | ४०.६ |

**वरील प्रमाणे नेमणूक करणेत आलेल्या शिकाऊ उमेदवारांकरीता प्रशिक्षण कालावधीमध्ये खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.**

१) web site :- www.apprenticeship.gov.in (DGET MIS PORTAL) यावर उमेदवारांचे रजिस्ट्रेशन असणे आवश्यक आहे. व्यवसाईक प्रशिक्षणार्थी म्हणून या आदेशान्वये देण्यात आलेली नेमणूक पूर्णत: निश्चित कालावधीची आहे. प्रशिक्षण कालवधी पुर्ण होताच दिलेली नेमणूक संपुष्टात येईल. व्यवसाईक पदावरील प्रशिक्षणार्थीचा महापालिका आस्थापनेवर कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.

२) सदरची नेमणूक ही उमेदवारांनी सादर केलेल्या शैक्षणिक अर्हता व तांत्रिक पात्रता ( ITI उत्तीर्ण) तसेच शाळेचे, जातीचे, आधारकार्ड इ. प्रमाणपत्राच्या छायांकित सत्यप्रति तपासून देण्यात आलेली आहे. त्यामध्ये काही तफावत आढळून आल्यास तसेच प्रशिक्षणार्थी आदेशातील अटी व शर्तींचा भंग करीत असल्यास सदची नेमणूक तात्काळ रद्द करण्यात येईल.

३) नेमणूक दिलेल्या शिकाऊ उमेदवारांनी महापालिका प्रशासन विभागामध्ये त्वरीत रूजू होऊन शैक्षणीक अर्हतेची, शाळेच्या व जातीच्या मुळ प्रमाणपत्रासह दोन प्रतित सत्यप्रती सादर करणे आवश्यक आहे. त्याबरोबर स्वत:चे पाच फोटो यापैकी दोन फोटो स्वतंत्र पेपरवर चिटकवून तुम्हास ओळखणा-या अधिकारी/पदाधिकारी यांची स्वाक्षरी घेऊन सादर केल्यानंतरच रूजू करून घेण्यात येईल. मुळ प्रती एक महिन्याचे कालावधित परत घेऊन जाणेची जबाबदारी उमेदवारांची असेल. त्वरीत रूजू न झाल्यास कोणताही पत्रव्यवहार न करता तुमची नेमणूक रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

४) शिकाऊ उमेदवारास नेमून दिलेला प्रशिक्षण कालावधी पूर्ण करावा लागेल. अधिनियम १९६१ मधिल तरतुदीनुसार शेड्युल ३ नियम १४ नुसार करारनामा द्यावा लागेल. सदरचा करारनामा उमेदवारांनी स्वत: स्वतंत्र तीन प्रतित टंकलिखित करून साक्षीदारांच्या सहिने सादर करणे आवश्यक राहील. अपूर्ण तसेच खाडाखोड व चुकीचे फॉर्म स्विकारले जाणार नाहीत.

५) प्रशिक्षण कालावधीत उमेदवाराची गैरहजेरी व गैरवर्तणूक आढळून आल्यास त्यांस कोणतीही पूर्वसुचना अथवा नोटीस न देता प्रशिक्षणार्थी पदावरून कमी केले जाईल तसेच कोणताही मोबदला दिला जाणार नाही.

६) अधिनियम १९६१ मधिल नियमानुसार वर्षाकरिता किरकोळ रजा १२ व वैद्यकीय रजा १५ दिवस अनुज्ञेय राहतील. तसेच दर तीन महिन्यानंतर वेगवेगळया विभागात तसेच क्षेत्रिय कार्यालयामध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून काम करावे लागेल.

७) प्रशिक्षणाची वेळ ही संबधीत कार्यालयाचे वेळेप्रमाणे राहील. सर्व शासकिय सुट्या देय राहतील. उमेदवारांना शिफ्टमधील व अन्य पदाचे कामकाज देय राहणार नाही.

८) शिकाऊ उमेदवारांची संविदा मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगीक सुचना केंद्र, निगडी, पुणे- १९. यांचे कार्यालयात कोणत्याही कारणास्तव (रजिस्ट्रेशन) नोंदणी न झाल्यास त्यांची नेमणूक त्वरीत रद्द होऊन त्यांना कार्यमुक्त करण्यात येईल याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

९) मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगीक सुचना केंद्र, निगडी, पुणे-१९. यांचे मार्फत होणा-या परिक्षेस बसण्यास आवश्यक कागदपत्रांची व फीची पुर्तता संबधित उमेदवारांनी स्वत: करावयाची आहे. त्याकरीता प्रशिक्षण कालावधी पूर्ण होण्याच्या तीस दिवस आधी प्रशासनतील टेबल क्र.११ यांचेकडे संपर्क साधून माहिती घ्यावी. अन्यथा त्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहिल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

१०) पिं.चि.मनपाचे औद्योगीक प्रशिक्षण संस्था, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पिंपरी चिंचवड पुणे १९ यांचेकडील प्राप्त यादीतील उमेदवारांना तसेच जाहिरात प्रसिध्दीतील प्राप्त अर्जातील पात्र उमेदवारांना नेमणूक देणेत येत आहे

सही/-
सहाय्यक आयुक्त, प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८

**प्रति,**
**सर्व संबंधित शिकाऊ उमेदवार.**

**प्रत – १) लेखा विभाग २) मुलेप विभाग ३) संबंधित विभाग**

शिकाऊ उमेदवारांना आपले नियंत्रणाखाली विविध विभागांमध्ये तसेच क्षेत्रीय कार्यालयात दर तीन महिन्यानंतर प्रशिक्षणार्थी म्हणून नेमणूक देण्यात यावी. उमेदवारांना दरमहा द्यावयाचे विद्यावेतन, कामगार कल्याण विभागाकडून दर सहा महिन्यांनी किमान वेतनाचे दर मागवून प्रशिक्षणाचे कालावधीनुसार एकूण **किमान वेतनाचे ७०%, ८०%, ९०%** याप्रमाणे **विद्यावेतन** प्रत्यंक महिन्याचे **पाच तारखे** पर्यंत देणेत यावे.(**सहा महिने ते एक वर्ष** शिकाऊ उमेदवार कालावधी परंतु **आय.टीय.आय.प्रशिक्षण उत्तीर्ण नसलेल्या** उमेदवारांना दरमहा किमान वेतनाच्या **७०%**, **एकवर्षाचे आय.टी.आय प्रशिक्षण उत्तीर्ण** अश्या उमेदवारांना दरमहा किमान वेतनाच्या **८०%**, **दोन वर्षाचे आय.टी.आय.प्रशिक्षण उत्तीर्ण** अश्या उमेदवारांना किमान वेतनाच्या **९०%** विद्यावेतन अदा करावे.)

प्रशिक्षणार्थीना प्रत्येक महिन्याचे ०५ तारखेपुर्वी हजेरी प्रमाणे विद्यावेतन अदा करून विद्यावेतन बँक खात्यामध्ये जमा केल्याचा पुरावा म्हणून त्यांच्या पासबुकची छायांकीत प्रत व हजेरी प्रशासनास सादर करावी. सदरची माहिती ०५ तारखे पर्यंत सादर न केल्यास अथवा विलंबाने सादर केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विभागप्रमुख/शाखाप्रमुख यांची राहील. प्रशिक्षणार्थीना त्यांचे व्यवसायाचे सखोल प्रशिक्षण देण्यास संबधीत अधिकारी/कर्मचारी यांना सूचना देण्यात याव्यात. प्रशिक्षणार्थी सतत गैरहजर राहिल्यास तसेच शिस्तभंग केल्यास त्यांचेवर विभागप्रमुखांनी कारवाई करावी. त्यांना व्यावसाईक परिक्षेस बसण्यास आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून आपले मार्फत फॉर्मवर स्वाक्षरी देण्यात यावी. तसेच प्रशिक्षार्थींचा प्रशिक्षण कालावधी पूर्ण होताच त्यांना कार्यमुक्त करण्यात यावे. अधिनियमानुसार उमेदवारांचा प्रशिक्षण कालवधी निश्चित असल्याने त्यांच्या कालावधीत वाढ होणार नाही. उपरोक्त प्रमाणे नेमणूक देण्यात आलेल्या प्रशिक्षण

कालावधीकरीता उमेदवारांना नेमणूक देण्यात आलेली आहे याची स्पष्ट नोंद घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत शिकाऊ उमेदवारांचा कालावधी वाढविण्याचा प्रस्ताव सादर करू नये. प्रशिक्षणार्थिंचा कालावधी महाराष्ट्र शासन, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगीक सुचना केंद्र, निगडी, पुणे-१९. यांचेकडून निश्चित करण्यात आलेला आहे.

५) मा. प्राचार्य, मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, व्दारा-औद्योगीक प्रशिक्षण संस्था पिंपरी चिंचवड, टेल्कोरोड निगडी, पुणे-१९ यांना माहितीकरिता सादर.

प्रशासन अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.